अस्सल सोलापुरी

# सुराज्य

सोलापूर

सोलापूर, पुणे, सांगली, धाराशिव, लातूर, विजयपूर, कलबुर्गी, बिदर, बीड

www.surajyadigital.com | शुक्रवार, दि. ९ जून २०२३ | वर्ष : २१ वे | अंक : २५० वा किंमत : ५ रुपये | पाने ८

## दुसऱ्या दिवसअखेर टीम इंडियावर फॉलोऑनची नामुष्की ?



ओव्हल : जागतिक कसोटी विजेतेपदाच्या फायनलमध्ये टीम इंडियाची दुसऱ्या दिवसअखेर पाच बाद १५१ अशी घसरगुंडी उडाली आहे. दुसऱ्या दिवसाचा खेळ थांबला त्या वेळी अजिंक्य रहाणे २९ धावांवर आणि श्रीकर भरत ५ धावांवर खेळत होते. या कसोटीत ऑस्ट्रेलियानं तीन बाद ३२७ धावांवरून पहिल्या डावात सर्व बाद ४६९ धावांची मजल मारली.

भारताला फॉलोऑनची नामुष्की टाळण्यासाठी किमान २७० धावांची मजल मारण्याची गरज आहे. त्यासाठी टीम इंडियाला अजूनही ११९ धावांची आवश्यकता आहे. टीम इंडिय अद्याप ३१८ धावांनी पिछाडीवर आहे. सध्या अजिंक्य रहाणे आणि केएस भरत मैदानावर आहेत. भारताकडून मोहम्मद सिराजनं १०८ धावांत चार फलंदाजांना माघारी धाडलं. मोहम्मद शमी आणि शार्दूल ठाकूरनं प्रत्येकी दोन विकेट्स काढल्या. पण भारतीय गोलंदाजांच्या या कामगिरीला भारतीय फलंदाजांना न्याय देता आला नाही.

रोहित शर्मा, शुभमन गिल, चेतेश्वर पुजारा आणि विराट कोहली स्वस्तात माघारी परतले. अजिंक्य रहाणे आणि रवींद्र जाडेजानं ७१ धावांची झुंजार भागीदारी रचली. पण नॅथन लायननं जाडेजाला माघारी धाडून ही जोडी फोडली. त्यामुळं टीम इंडियासमोर फॉलोऑनचा धोका कायम आहे.


# लवकरच उलथापालथ...

## चव्हाणांनी उपसले हत्यार

## नानांची गच्छंती होणार ?

सुराज्य/विशेष प्रतिनिधी

महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसमधील नेत्यांमध्ये एकमेकांच्या पायात पाय घालून एकेकांना आडवे करण्याचे कारस्थान सुरूच आहे. प्रदेश अध्यक्ष नाना पटोले यांची या पदावरून उचलबांगडी करावी म्हणून नवी दिल्लीत हायकमांडकडे पुन्हा कुरापत्या सुरू झाल्या आहेत.पटोले आणि इतर नेते यांच्यात आडवे विस्तव जात नाही. प्रदेश पातळीवर पक्षात मोठी गटबाजी असल्याचे लपून राहिलेले नाही. नानांच्या गच्छंतीसाठी ज्येष्ठ नेते आणि माजी मुख्यमंत्री अशोक चव्हाण गेल्या दोन दिवसांपासून दिल्लीत तळ ठोकून असल्याचे वृत्त आहे. या पदासाठी खुद्द चव्हाण हेच प्रबळ दावेदार असल्याची चर्चा आहे. एकंदरीत हालचाली पाहता काँग्रेस पक्षात लवकरच उलथापालथ होण्याची चिन्हे दिसत आहेत.



### प्रतिक्षा राहुल यांच्या आगमनाची...



पुढील दोन दिवसात काँग्रेसचे नेते राहुल गांधी परदेशातून भारतात दाखल होणार आहेत. त्यानंतर महाराष्ट्र काँग्रेसमध्ये मोठे बदल होण्याची शक्यता आहे. काँग्रेस प्रदेशाध्यक्ष पदासाठी अशोक चव्हाण यांच्या नावाला राज्यातील अनेक काँग्रेस नेत्यांची पसंती असल्याची माहिती आहे. काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष पदासोबत मुंबई अध्यक्ष, गटनेता आणि महाराष्ट्र प्रभारी या चारही पदांमध्ये मोठे बदल होण्याची शक्यता असल्याची चर्चा आहे.

### नानांचेही दबावतंत्र...

पक्षातील आपल्या विरोधकांना नामोहरम करण्यासाठी पटोले यांनी देखील दबावतंत्र अवलंबल्याचे दिसून येते.दिल्लीत कटकारस्थाने सुरू असल्याचे समजताच नानांनी आपल्या समर्थकांना दिल्लीला पाठवले.पटोलेंच्या समर्थनार्थ दोन दिवसांपूर्वी काँग्रेस नेत्यांनी घेतली पक्षश्रेष्ठींची भेट घेतली. नागपुरातील, तसेच राज्यातील काही नेत्यांनी पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे आणि सचिव मुकुल वासनिक यांची भेट घेतली. यावेळी नागपूर काँग्रेस जिल्हाध्यक्ष आमदारविकास ठाकरे, नव निर्वाचितआमदार धिरज लिंगाडे, म्युझीब पठान, उमाकांत अग्निहोत्री यांनी पक्षश्रेष्ठींची भेट घेतली. या भेटीत पटोले यांनाच काँग्रेस प्रदेशाध्यक्षपदी कायम ठेवण्याची आग्रही मागणी करण्यात आलीय.

### थेट हायकमांडकडे तक्रार

परिस्थिती बदलायची असेल तर नाना पटोले यांना बदला, अशी मागणी खर्गे यांची भेट घेऊन केली आहे. बाळासाहेब थोरात,पृथ्वीराज चव्हाण, शिवाजीराव मोघे, विजय वडेट्टीवार, सुनील केदार, संजय निरूपम,अशोक चव्हाण अशा नेत्यांची तोंडे एकीकडे असतात तर पटोले यांचे तोंड वेगळ्याच दिशेला असते.पटोले यांच्याकडून स्वबळाची भत्तषा असते. राष्ट्रवादी काँग्रेसमधील काही नेत्यांना त्यांचा आक्रमकपणा नको आहे.

### चाललेय तरी काय ?

पटोले हे विदर्भातील. मराठवाडा, कोकण, प.महाराष्ट्रातील नेत्यांचे आणि पटोले यांचे सूत जुळते की नाही हे कळायला मार्ग नाही पण जन्म आणि कर्मभूमी असलेल्या पटोलेंच्या इलाख्यातच नाना आणि नेत्यांचे जमेनासे झाले आहे. गोंदियात काँग्रेसमधील आपसी मतभेद चव्हाट्यावर आले. जिल्हा काँग्रेस बचाव समितीकडून पटोलेंच्या विरोधात धरण आंदोलनही केले गेले.खुद्द आपल्याच गावातून बंड सुरू झाल्यानंतर पटोलेंच्या पक्षात चाललेय तरी काय? असा संतप्त सवाल विचारला गेला.

दिल्लीतून अशोक चव्हाण यांच्या नावाला अद्याप कुठलाही ग्रीन सिग्नल नाही. तर दुसरीकडे पटोले यांच्यासोबत काम करता येणार नाही, असा सूर राज्यातील अनेक नेत्यांचा आहे. पटोले यांच्या कार्यपद्धतीवर टीक करत अनेक नेत्यांनी या आधी म्हणजेच मे महिन्याच्या शेवटच्या आठवड्यात नाराजी व्यक्त केली होती.नाराजीचे तसे पत्रही याआधी हायकमांडला पाठवण्यात आले आहे. पटोले यांना पदावरून हटवण्यात यावे यासाठी काँग्रेसच्या अनेक नेत्यांनी राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांचीही घेतली भेट घेतली होती. या सर्व परिस्थितीत येत्या आठ दिवसात काँग्रेसच्या प्रदेशाध्यक्षपदाचा निर्णय होण्याची दाट शक्यता आहे. प्रदेशाध्यक्ष बदलला तर राज्यातील सर्व कार्यकारिणीही बदलावी लागणार आहे. राज्यातील सर्व काँग्रेस नेत्यांना एकत्र घेऊन चालणारा आणि महाविकास आघाडीशी योग्य समन्वय ठेवणाऱ्या नेत्यांवर प्रदेशाध्यक्षपदाची जबाबदारी येण्याची शक्यता आहे. यामध्ये चव्हाण यांचे नाव आघाडीवर आहे. या आधीही त्यांना दिल्लीमध्ये बोलवण्यात आले होते.

---

मिशन चिमणी पाडकामाचे...

## ‘सिध्देश्वर’च्या कारखाना स्थळाची पोलीस प्रशासनाकडून पाहणी

सुराज्य/सोलापूर

होटगी रोडवरील विमानतळास अडथळा ठरणारी सिध्देश्वर सहकारी साखर कारखान्याची चिमणी पाडण्याच्या अनुषंगाने प्रशासनाच्या हालचाली सुरू असल्याचे दिसून येत आहे.दरम्यान, चिमणी पाडण्याचा अंतिम निर्णय झाल्यास पोलिसांचा मोठा बंदोबस्त ठेवावा लागणार आहे. याच अनुषंगाने पोलीस आयुक्त राजेंद्र माने, उपायुक्त विजय कबाडे यांच्यासह इतर अधिकाऱ्यांनी सिध्देश्वर साखर कारखाना परिसराची पाहणी केली आहे.

महापालिका आयुक्त शीतल तेली-उगले यांनी चिमणी पाडण्यासंदर्भात कारखाना प्रशासनाला नोटीस दिली आहे. नोटिसीला ११ जूनपर्यंत मुदत आहे. ही मुदत संपल्यानंतर प्रशासनाकडून चिमणी पाडकामा संदर्भात निर्णय घेतला जाऊ शकतो. सोलापूर विकास मंचच्या सदस्यांनी या संदर्भात प्रशासनाकडे सातत्याने पाठपुरावा केला आहे. गतवेळी चिमणी पाडकामावेळी मोठा गोंधळ झाला होता. या अनुषंगाने महापालिका आयुक्तांनी बैठक घेऊन पोलीस अधिकाऱ्यांसोबत बैठक घेऊन चर्चा केल्याचे सांगण्यात येत आहे. दरम्यान, याच अनुषंगाने पोलीस आयुक्त राजेंद्र माने, उपायुक्त विजय कबाडे यांच्यासह इतर अधिकाऱ्यांनी सिध्देश्वर साखर कारखाना परिसराची पाहणी केली आहे.



### बंदोबस्ताबाबत पोलीस आयुक्त निर्णय घेतील

चिमणीसाठी कारखाना स्थळाची पहाणी केली आहे. हा विषय संवेदनशील आहे. मागच्यावेळीची परिस्थिती पाहता यंदा मोठा पोलीस बंदोबस्त लावावा लागणार आहे. पोलीस आयुक्त याबाबत निर्णय घेतील आणि त्यानुसार पोलीस बंदोबस्त लावला जाईल, असे एमआयडीचे पोलीस निरीक्षक राजन माने यांनी सांगितले.

## पंढरपूर अर्बन बँकेच्या २२ एटीएममधून तीन कोटी रुपये लंपास

सुराज्य/पंढरपूर

वेगवेगळ्या बँकांचे कार्ड वापरून दी पंढरपूर अर्बन को.ऑप. बँकेच्या विविध २२ शाखा मधील एटीएम मधून तीन कोटी तीन हजार रुपये अज्ञात चोरट्याने लंपास केल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे.

विशेष म्हणजे या चोरट्याने यासाठी ६६८ एटीएम कार्ड वापरले आहेत. याबाबत अर्बन बँकेचे व्यवस्थापक राजेश आगवणे यांनी पंढरपूर शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे. मिळालेल्या माहितीनुसार, पंढरपूर अर्बन बँकेच्या राज्यभरात ३० शाखा असून यामधील २८ एटीएम मशीन मधून विविध बँकांचे पैसे काढण्याची सुविधा उपलब्ध आहे. याचा चोरट्यांनी फायदा घेत दुसऱ्या बँकांचे एटीएम वापरून सदर रक्कम लंपास केली. अज्ञात चोरट्याने ६६८ एटीएम कार्डद्वारे पंढरपूर अर्बन बँकेच्या विविध गावातील एटीएम मशीन मध्ये पैसे काढताना तांत्रिक बिघाड निर्माण केला. सदर चोरट्यांनी एटीएम मधून पैसे बाहेर येताच कॅश डोर अर्थात ज्या मधून पैसे बाहेर येतात त्या शटर मध्ये अडथळा निर्माण करण्याचा प्रयत्न केला. पैसे येणाऱ्या शटरमध्ये बोट लावताच किंवा पट्टी लावल्यास ज्या बँकेचे एटीएम आहेत तेथे एरर अर्थात अडथळा निर्माण होतो. यामुळे पैसे काढू न देखील बँकेच्या खात्यांमधील पैसे कमी होत नाहीत. या तांत्रिक गोष्टीचा फायदा घेऊन अज्ञात चोरट्यांनी २४ मार्च ते १९ मे या कालावधीत पंढरपूर अर्बन बँकेच्या पंढरपूर, सोलापूर, पुणे, बारामती, लातूर, कोल्हापूर, इंदापूर, बार्शी, फलटण, कोरेगाव, कराड, औरंगाबाद, वैराग आदी शाखा मधील एटीएम मधून तीन कोटी तीन हजार दोनशे रुपये लंपास केले आहेत. याच पद्धतीने महाराष्ट्रातील तसेच इतर राज्यातील बँकांमधून देखील पैसे काढण्याचे प्रकार समोर आले आहेत. यातील आरोपी सीसीटीव्ही मध्ये स्पष्टपणे दिसत असून त्यांचा तपास सुरू असल्याची माहिती शहर पोलीस निरीक्षक अरुण फुगे यांनी दिली.



## आनंदाची बातमी! ‘मान्सून’ केरळमध्ये दाखल

सुराज्य/नवी दिल्ली

अखेर गुरुवारी (८ जून) मान्सून केरळात दाखल झाला. दरवर्षी सामान्यपणे १ जून रोजी केरळमध्ये दाखल होणारा मान्सून लांबल्याने शेतकरी चिंतेत होता. यामुळे शेतकऱ्यांमध्ये समाधानाचे वातावरण दिसत आहे. दरम्यान, यावर्षी मान्सूनला केरळात दाखल व्हायला ७ दिवस उशीर झाला आहे.

केरळनंतर आता मान्सून तामिळनाडू, कर्नाटक आणि इतर भागात जाईल. चक्रीवादळ गेले की, मान्सून पूर्ण तीव्रतेने देशाच्या इतर भागात वाटचाल करेल, असाही अंदाज वर्तवला जात आहे. यंदा बिपरजॉय चक्रीवादळामुळे मान्सूनवर परिणाम झाला आहे. सुरुवातीच्या काळात मान्सून कमी तीव्रतेचा असेल, असा इशारा भारतीय हवामान खात्याने दिला आहे. मान्सूनच्या आगमनानंतर पहिल्या आठवड्यातील प्रवासावरून त्याच्या देशातील पुढील वाटचालीचा अंदाज बांधता येणार आहे.



### लवकरच मान्सून महाराष्ट्रात

दरम्यान, आधी भारतीय हवामान खात्याने ९ जूनला मान्सून महाराष्ट्रात दाखल होईल असा अंदाज वर्तवला होता. मात्र, केरळमध्ये दाखल व्हायलाच ८ जूनचा दिवस उजाडल्याने आता महाराष्ट्रातील मान्सूनचा प्रवेश पुढे ढकलला आहे. असं असलं तरी पुढील ३-४ दिवसात मान्सून राज्यात दाखल होऊ शकतो.

## नरखेडमध्ये घरातून पावणे पाच लाखांची चोरी

सुराज्य/मोहोळ

नरखेड येथे घराला आतून कुलूप लावून घरातील टेरेसवर झोपलेल्या घराच्या किचनच्या दरवाजाचा कडी कोयंडा उचकटून आतमध्ये प्रवेश करून दागिन्यासह रोख रक्कम पावणे पाच लाखांची चोरी करण्यात आली.

नरखेड येथील विष्णू लक्ष्मण राऊत हे आपल्या कुटुंबासह त्या ठिकाणी राहतात त्यांची पुण्याहून आलेली मुलगी अनगर येथे नातेवाईकाचा कार्यक्रम असल्यामुळे नरखेड येथे त्यांच्याकडे राहण्यास आली होती. तिने त्यांच्याकडचे दागिने नरखेड येथील त्यांच्या घरी ठेवले होते. अनगर येथे कार्यक्रमाला गेली होती रात्री घरांमध्ये गरम होत असल्याने विष्णू राऊत व त्यांची पत्नी हे टेरेसवर झोपायला गेले. सकाळी सहा वाजता उठल्यानंतर त्यांनी दरवाजा उघडण्याचा प्रयत्न केला असता दरवाजा उघडत नव्हता दरवाजाला आतून कडी लावण्यात आलेली होती.

शेजारच्या मार्फत त्यांनी टेरेस दरवाजा उघडून आत मध्ये पाहिले असता त्यांच्या घरामध्ये चोरी झाली असल्याचे त्यांच्या निदर्शनास आले. यामध्ये अर्धा तोळ्याच्या पिळ्याच्या पाच अंगठ्या, एक तोळा सोन्याची अंगठी, दोन लक्ष्मी मार्किंग केलेली गोल शिक्के, अर्धा तोळ्याचे नेकलेस, कानातील झुबे, गंठण, असा एकूण चार लाख ६९ हजार रुपये किमतीचा ऐवज चोरट्यांनी चोरून नेला याबाबत राऊत यांनी मोहोळ पोलीस ठाण्यामध्ये फिर्यादी असून या घटनेचा तपास मोहोळ पोलीस करत आहेत.



### तिसरा डोळा

– प्रकाश पोरे




इकडे डुलकी लागली, तिकडे दिशा बदलली!

| कल्याण |
| --- |
| 336-24-248 |

| मेन बाजार |
| --- |
| 150-69-126 |

भाजपाचे ‘मिशन लोकसभा-विधानसभा’

## सोलापूरसाठी विक्रम देशमुख तर माढ्यासाठी परिचारक निवडणूक प्रमुख

### जिल्ह्यातील ११ विधानसभेसाठीही प्रमुख नेमले

सुराज्य/सोलापूर

आगामी लोकसभा व विधानसभा निवडणूक लक्षात घेऊन सर्वच राजकीय पक्ष कामाला लागले आहेत, मात्र त्यात भाजपाने आघाडी घेतली आहे. राज्यातील २८८ विधानसभा मतदारसंघ व ४८ लोकसभा मतदारसंघांमध्ये त्यांनी निवडणूक प्रमुख म्हणून भाजप पदाधिकाऱ्यांवर जबाबदारी दिली आहे. यामध्ये सोलापूर लोकसभा निवडणूक प्रमुख म्हणून शहराध्यक्ष विक्रम देशमुख तर माढा लोकसभा निवडणूक प्रमुख म्हणून माजी आ. प्रशांत परिचारक यांची नेमणूक केली आहे. विधानसभा निवडणूक प्रमुखांचीही नेमणूक करण्यात आली असून विशेष म्हणजे यात शिवसेनेच्या ( शिंदे गट) जागांचाही समावेश आहे.

उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सागर निवासस्थानी शनिवारी भाजपाचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकी या निवडी करण्यात आल्या. यावेळी भाजपाचे सर्व खासदार आणि आमदार उपस्थित होते. त्यानंतर आज गुरुवारी भाजपचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी या नियुक्त्या जाहीर केल्या. प्रदेशाध्यक्ष बावनकुळे सोलापूर दौऱ्यावर आले असता त्यांनी या निवडीबाबत संकेत दिले होते. सोलापूर शहरातील २ लोकसभा आणि ११ विधानसभेच्या प्रमुखांच्या निवडी गुरूवारी जाहीर झाल्या. जिल्ह्यातील ११ विधानसभा मतदारसंघातही ११ विधानसभा मतदारसंघनिहाय निवडणूक प्रमुख नेमण्यात आले आहेत. ते असे, करमाळा- गणेश चिवटे, माढा- रणजितसिंह मोहिते-पाटील, मोहोळ- सुनील चव्हाण, बार्शी- रणवीर राऊत, सोलापूर शहर उत्तर- राजकुमार पाटील, सोलापूर शहर मध्य- श्रीकांचना यन्नम, अक्कलकोट- राजकुमार झिंगाडे, सोलापूर दक्षिण- हणमंत कुलकर्णी, पंढरपूर- राजेंद्र सुरवसे, सांगोला- चेतनसिंह केदार राऊत, माळशिरस - धैर्यशील मोहिते-पाटील.

### प्रमुखांवर ही असणार जबाबदारी

प्रमुखांवर मतदारांबरोबर नियमित संपर्क, पक्षाची धोरणे, केंद्र व राज्य सरकारच्या योजनांचा लाभ घेतलेल्यांची नाव, पत्त्यासहित यादी, पदाधिकाऱ्यांच्या नियमित बैठका, त्यांच्या कामाचा आढावा अशी कामांची जंत्रीच पदाधिकाऱ्यांना देण्यात आली आहे.

### सेनेच्या मतदारसंघातही नेमले प्रमुख

गतवेळच्या विधानसभा निवडणुकीत सेनेने जिल्ह्यातील शहर मध्य, बार्शी, करमाळा, सांगोला आणि माढा हे मतदारसंघ लढवले होते. आता या तिन्ही मतदारसंघातही भाजपाने निवडणूक प्रमुख नेमले आहेत. त्यामुळे इच्छुकांमध्ये अस्वस्थता पसरली आहे.

सोलापूर लोकसभा निवडणूक प्रमुख म्हणून शहराध्यक्ष विक्रम देशमुख यांची निवड करण्यात आली आहे. एक व्यक्ती एकपद विचार करता आता शहराध्यक्षपद सोडावे लागण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे. सध्या शहराध्यक्षपदाची निवड प्रकिया सुरू आहे. त्यामुळे आता भाजप शहराध्यक्षपदाबाबत उत्सुकता वाढली आहे.